INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATIO

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018 Special Issue – LXV

Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar
Assistant Professor,
Dept. of Marathi,
MGV's Arts and Commerce College, Yeola
Dist. Nashik (M.S.) India.

Executive Editors :

- Mr. Ananta Kasture, Head, Dept. Of Marathi, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Manik Wangikar, Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Vaman Sargar, Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Santosh Bandgar , Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC) List No. 40705
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- Indian Citation Index (ICI)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 65 : लक्ष्मीकांत देशमुख यांचे समग्र साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October -2018

## INDEX


| Sr. No | Title of the paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| | लक्ष्मीकांत देशमुख यांचे समग्र साहित्य | | |
| 1 | वर्तमानाचे भान जपनारा सर्जनशील लेखक | – प्रा. डॉ. राजशेखर दुडुकनाळे | 8 |
| 2 | लक्ष्मीकांत देशमुख : एक संवेदनशील लेखक | – प्रा. ज्ञानेश्वर म्हात्रे | 12 |
| 3 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे व्यक्तित्व व वाङ्मयीन कार्य | – प्रा. डॉ. विशाल लिंगायत | 15 |
| 4 | लक्ष्मीकांत देशमुख यांची मराठीच्या भविष्यकाळाविषयीची भूमिका | –प्रा.माणिक वागीकर | 18 |
| 5 | लक्ष्मीकांत देशमुख : व्यक्ती व वाङ्मय | – प्रा. सुरेखा व्हसमने | 20 |
| 6 | लक्ष्मीकांत देशमुख : व्यक्ती व वाङ्मय | – प्रा. राजाराम पाटील | 23 |
| 7 | लक्ष्मीकांत देशमुख : व्यक्ती व वाङ्मय | – प्रा. डी. एस. पाटील | 26 |
| 8 | लक्ष्मीकांत देशमुख : व्यक्ती व वाङ्मय | –प्रा निता कदम | 28 |
| 9 | लक्ष्मीकांत देशमुख : व्यक्ती व वाङ्मय | – प्रा.लक्ष्मी पवार | 31 |
| 10 | लक्ष्मीकांत देशमुख : व्यक्ती व वाङ्मय | – प्रा.नागेश डांबरे व प्रा.डॉ. बबन गायकवाड | 35 |
| 11 | ल. देशमुख यांच्या साहित्यातील राजकीय व सामाजिक चिंतन | – प्राचार्य डॉ. अरुण गाडे व डॉ. सलीम पठाण | 38 |
| 12 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील स्त्री जाणीवा | – प्रा.वर्षा फाटक | 44 |
| 13 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील स्त्री जाणीवा | – प्रा. डॉ.सुनिता गित्ते | 47 |
| 14 | लक्ष्मीकांत देशमुख यांची लेखन शैली | –प्रा. डी. एस. आवाळे | 50 |
| 15 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील विचारविश्व | – डॉ. अशोक तवर व डॉ. संभाजी शिंदे | 52 |
| 16 | प्रेरणादायी आत्मपर लेखन | – प्रा. डॉ. कमल दणाणे | 57 |
| 17 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे कादंबरी लेखन | – प्रा. डॉ. प्रवीण लोंढे | 60 |
| 18 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे कादंबरी लेखन | – प्रा. डॉ. शशिकला रणदिवे | 63 |
| 19 | ल. देशमुखांची मुस्लीम स्त्रियांचा सामाजिक दर्जा प्रकटणारी कादंबरी | – प्रा. डॉ. शिवाजी परळे | 68 |
| 20 | लक्ष्मीकांत देशमुखांच्या 'अंधेरनगरी' चे राजकीय मूल्यमापन | – प्रा. रवींद्र पाटील | 73 |
| 21 | 'यंग इंडियाचा ग्रुप सेल्फी' मधील सामाजिक अनुबंध | – प्रा. डॉ. देवमन कामडी | 79 |
| 22 | बालकामगारांचे अनुभवविश्व: हरवलेले बालपण | - प्रा. डॉ. प्रियांका कुंभार | 87 |
| 23 | 'इन्किलाब विरुद्ध जिहाद': संस्कृति संघर्ष की कहानी | – प्रा. संतोष वडगर | 91 |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 65 : लक्ष्मीकांत देशमुख यांचे समग्र साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October -2018

# लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील विचारविश्व

डॉ. अशोक तवर विभागप्रमुख, मराठी विभाग,
एल. बी. एस. कॉलेज, सातारा.
प्रा. डॉ. संभाजी आण्णू शिंदे, सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
आर.एन.चांडक आर्टस् कॉलेज, नाशिक रोड. जि – नाशिक.
भ्रमणध्वनी – ९८२२३४६१५६ चलभाष – rajesambhaji.shinde983@gmail.com.

**प्रास्ताविक :**

भारतीय समाजपरंपरेमध्ये साधारणतः १९५० नंतर म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंडापासून प्रचंड मोठ्याप्रमाणात बदल झालेले दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील लोकशाही राजवट, पंचवार्षिक योजना, इतरही असंख्या शासकीय विकास योजना यामुळे डोंगरदऱ्यातील, जंगलातील आदिवासींपर्यंत विकासयोजना राबविण्याचे प्रयत्न झाले. परिणामी खेड्यापाड्यातील तरूण शिकू लागले. यापैकीच एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे लक्ष्मीकांत देशमुख होत. एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या पोटी जन्मलेल्या लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर विविध साहित्यप्रकारात विपूल साहित्यनिर्मिती केलेली पहावयास मिळते. प्रशासकीय अधिकारी पदावरचा प्रदिर्घ अनुभव असलेल्या लक्ष्मीकांत देशमुख यांनी मराठी साहित्याला मात्र कधीही अंतर दिलेले दिसत नाही. त्यांनी निर्माण केलेल्या असंख्या कथा, कादंबऱ्या आणि ललित लेखनाच्या माध्यमातून त्यांची सर्वसामान्य समाज जीवनाविषयीची असलेली जान प्रकर्षाने जानविते. त्यांनी केवळ केवळ मराठीतच नव्हे तर इंग्रजी भाषेमधूनही काही लेखन केलेले आहे. आजही प्रशासकीय सेवा बजावित असतांना देखील ते तितक्याच तन्मयतेने आपले विचारविश्व साहित्याच्या माध्यमातून प्रतिबिंबित करतात हे विशेष.

खेड्यापाड्यातील सर्वसमान्य मानवी जगणे लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपला अभ्यास विषय बनविलेला आहे. वास्तविक पाहता एका बाजूला आधुनिकीकरणाचे प्रस्त वाढले असतानाही, आधुनिकीकरणाने प्रत्येक प्रांतामध्ये आपले अस्तित्व सिद्ध केलेले असतांनाही लक्ष्मीकांत देशमुखांनी मात्र आपल्या साहित्याच्या माध्यमातून ग्रामीण वास्तवाचे प्रतिबिंब आपल्या साहित्यातून वास्तवपणे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचे दिसते. वर्तमान साहित्यिकांमध्ये दुर्मिळ असलेली ही प्रवृत्ती देशमुखांनी मात्र नाकारलेली दिसून येते. त्यांचे साहित्य म्हणजे बदलत्या समाजजीवनाचे वास्तव प्रतिरूपच म्हणावे लागेल. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्याच्या माध्यमातून वर्तमान समाजातील तरूणांना जगण्याची नवी उर्मी प्राप्त होते. इतकेच नव्हे तर परिस्थितीला चिकटून न राहता आपल्या कर्तृत्वाच्या बळावर परिस्थितीवर मात मिळविता येते हे वास्तव देखील त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबित होताना दिसते. त्यामुळेच वर्तमान पिढीतील एक तरूण व सार्वजनिक जीवनावर चिंतनात्मक भाष्य करणारे एक महत्वपूर्ण साहित्यिक म्हणून त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे हे मान्यच करावे लागेल. त्यामुळेच नुकतेच बडोदा (मध्यप्रदेश) याठिकाणी झालेल्या अखिलभारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होऊ शकले. त्यांच्या साहित्यविश्वातील प्रामाणिक आणि अजातशत्रू कार्याचा चिकित्सक आढावा प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**लक्ष्मीकांत देशमुख यांची वाङ्मयीन भूमिका :**

प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर, वृत्तपत्रव्यवसायाशी संबंधित व्यक्तींनी आजवर साहित्यनिर्मिती केलेली दिसून येते. प्रशासकीय व्यवसायाशी संबधित व्यक्तींने इतक्या विपूल प्रमाणात साहित्यनिर्मिती करणे ही बाब



Scanned with OKEN Scanner

निश्चितच उल्लेखनिय अशा स्वरूपाची आहे. अशाप्रकारे उच्चपदस्त व्यक्तीने साहित्यनिर्मितीचा ध्यास घेवून विपूल साहित्यनिर्मिती करणे ही बाब अगदी अलिकडच्या कालखंडातील असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारत सासणे, विश्वास पाटील यांच्या श्रेणीत लक्ष्मीकांत देखमुख यांचा निश्चितपणे अंतर्भाव करावा लागेल. अशाप्रकारे सर्वांगीन आणि आशयघन लेखन करणाऱ्या लक्ष्मीकांत देशमुख यांच्या ललितगद्य आणि एकूणच साहित्यनिर्मितीतील विचारविश्वाचा चिकित्सक आढावा घेणे हा माझ्या शोधनिबंधाचा प्रमुख हेतू आहे. त्यांच्या बहुसंख्य लेखांमध्ये त्यांनी प्रशासकीय सेवा बजावित असतांना विविध ठिकाणी त्यांना जे अनुभव आले याविषयीचा दुवा पहावयास मिळतो.

'लक्षदीप' या ललितगद्यामध्ये त्यांचे 'देवबंदचं दारूल उलुम', 'काश्मीरियत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली', 'लिंग असमानतेची विविध रूपे अर्थात लिंगभेदावर आधारित भारताची सामाजिक फाळणी' अशाप्रकारचे वैचारिक लेख आहेत. यामाध्यमातून त्यांची वैचारिक बैठक निश्चितपणे सिद्ध होते. अशाप्रकारचे ललित गद्य लेखन करीत असतांना काही मर्यादा जाणवितात. त्यामुळे काही वेळा राजकारणी लोकांची देखील बाजू मांडावी लागते. लक्ष्मीकांत देशमुख यांनी मी वर्तमान समाजव्यवस्थेवर भाष्य करणारा राजकीय लेखक आहे हे आपल्या साहित्यसमेलनाच्या अध्यक्षिय भाष्यनामध्ये मान्यच केले आहे ते पुढीलप्रमाणे, 'मित्रहो, मी ही व्यवस्थेवर प्रहार करणारा व ती बदलावी म्हणून लेखन करणारा राजकीय लेखक आहे. जेव्हा मी 'पाणी!पाणी!!' कथासंग्रहात पाणी टंचाई व दुष्काळाचा मानवी नातेसंबंधावर कसा परिणाम होतो याच्या कथा लिहिल्या तेव्हा त्याला कारणीभूत असणाऱ्या राजकीय नेते व नोकरशाहांच्या भ्रष्ट युतीवर कथेच्या ओघात भाष्य केले. ते माझे राजकीय लेखनच होते, असे मी मानतो. कारण, मला मानवी दुःखाला कारणीभूत असणारी निरंकुश सत्ता व नियंत्रणाची राजकीय व्यवस्था मान्य नसते. म्हणूनच भाष्य करतो. हिंदी कवी दुष्यंतकुमाराच्या 'मैं फरिश्ता हूँ, सच बताता हूँ!' या कवितेचा संदर्भ देत हे सांगू इच्छितो की, मीही त्याच जातकुळीचा फरिस्ता असलेला लेखक आहे व आजवर माझ्या कथा–कादंबऱ्यातून भ्रष्ट व्यवस्थेचे रूप नग्न करून कोरडे ओढणारे भाष्य केले आहे. ते राजकीय आहे व त्याला माझा नाईलाज आहे. मी माझ्या भोवताली व माझ्या राज्यात, देशात जे घडते आणि सामान्य माणसाच्या पदरी दारिद्र्य, वंचना आणि हतबलता इथली राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व्यवस्था व संस्था/पक्ष टाकतात, तेव्हा मी स्वस्थ बसू शकत नाही. मी त्यांच्यासाठी व त्यांच्या बाजूने आवाज उठवणार. पण माझा मार्ग साहित्याचा आहे व लेखणी हे माझे शस्त्र माध्यम आहे. पुन्हा माझ्या भारतीय संविधानाने मला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे.'[१] अशाप्रकारचे विवेचन करून राजकारणापासून दूर पळणाऱ्या लेखकांपैकी मी नाही ही भूमिका देशमुख त्यांनी मान्य केल्याचे दिसून येते. लक्ष्मीकांत देशमुख यांनी प्रवासवर्णन, आपत्मपर लेखन, प्रशासनपर लेखन, वैचारिक लेख, चित्रपट नाटक आणि ललित गद्य अशा सर्वच वाङ्मयप्रकारामध्ये विपूल लेखन केलेले आहे. यापैकी त्यांच्या ललित गद्यातील विचारविश्व प्रतिबिंबित करणे हा प्रस्तु शोधनिबंधाचा विषय आहे.

**लक्ष्मीकांत देशमुख यांच्या ललित गद्यातील विचारविश्व :**

वैचारिक लेखनाची भूमिका घेऊन लेखन करणाऱ्या लक्ष्मीकांत देशमुख यांनी 'देवबंदचं दारूल उलुम', 'काश्मीरियत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली', 'लिंगभेदावर आधारित भारताची सामाजिक फाळणी' हे तीन वैचारिक लेख लिहिले आहेत. यापैकी 'देवबंदचं दारूल उलुम' या लेखात त्यांनी उत्तर प्रदेशातील सहारणपूर जिल्ह्यातील 'देवबंद' या गावातील 'दारुल उलुम' चे वर्णन केले आहे. 'दारूल उलुम' या शब्दाचा कोशगत



Scanned with OKEN Scanner

अर्थ विश्वविद्यालय असा आहे. 'दारुल उलुम' हा पूर्व आशियातील सर्वात मोठा मदरशा आहे. या लेखाच्या माध्यमातून त्यांनी तेथील व्यवस्था, व्यवस्थापन, धर्मशिक्षण, खानपानरीती, जीवनरीती, शिस्त व कार्यपालनपद्धती यासारख्या बाबींचा मागोवा घेत तेथील चाकोरीबद्ध जीवनशैलीवरती प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. 'काश्मिरियत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली' या लेखात 'काश्मीरियत' या संकल्पनेचा चिकित्सक वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. 'काश्मीरियत' ही संकल्पना देशमुख यांनी पुढीलप्रमाणे अभिव्यक्त केली आहे, ''काश्मीरियत ही मूलत: काश्मीर लोकांची एतद्देशीय राष्ट्रवादी जाणीव, सामाईक स्वरूपाचे भान आणि सांस्कृतिक मूल्यांची प्रखर जाणीव असलेली सहअस्तित्वाची जीवनशैली आहे... तिची वैशिष्ट्ये धार्मिक व सांस्कृतिक सामंजस्य, आपल्या हिमालयाच्या डोंगराळ व निसर्गसुंदर, प्रदेशावरची प्रखर देशभक्ती आणि अभिमानही आहे.''[२] प्रस्तुत लेखाच्या माध्यमातून देशमुख यांनी साधारणत: सोळाव्या शतकातील विकसित काश्मिरियत या जीवनशैलीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत लेखाच्या माध्यमातून त्यांनी तत्कालिन सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनावरती प्रकाश टाकलेला अदसून येतो. वास्तविक पाहता त्यांचे लेखन हे आनेक अंगांनी परिपूर्ण ठरते. कारण त्यांनी काल्पनिकतेपेक्षा वास्तवतेशी अधिक संधान साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या ललितगद्यामध्ये सांविधानिक मूल्यांची जोपासणा केल्याचे प्रकर्षाने जाणविते. त्यांच्या लेखांमध्ये आत्मपरता जरी येत असली तरी आत्मपौढीपासून मात्र त्यांचे लेख दूर असल्याचे दिसून येते.

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या एकूणच प्रशासकीय आणि साहित्यिक वाटचालीमध्ये परभणी आणि कोल्हापूर या शहरांचा खूप मोलाचा वाटा आहे. या शहराविषयीची आत्मीयत आणि त्याविषयीची उपकृतता त्यांनी 'झपाटलेपण ते जाणतेपण' आणि 'परभणी व कोल्हापूरचे दिवस' या लेखांमध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यापैकी 'झपाटलेपण ते जाणतेपण' या लेखात लक्ष्मीकांत देशमुख यांच्या जीवनातील जडणघडणीचा तपशील नेमकेपणाने आला आहे. लेखकाची मूळ प्रकृती या लेखांच्यामाध्यमातून जाणविते. यापैकी परभणी या शहरामध्ये लेखकाची साहित्यिक कार्यकिर्द खऱ्या अर्थाने घडली आहे. तर कोल्हापूरने त्यांना जगण्याची आणि लिखाणाची नवी उमेद प्राप्त करून दिली आहे. याविषयीचा तपशील त्यांनी या दोन लेखसंग्रहामध्ये नोंदविला आहे. निखळ आणि प्रांजळ लेखन करणाऱ्या लक्ष्मीकांत देशमुख यांचे लेखन वास्तविक पाहता समाजाला भावणारे आणि प्रांजळ अशा स्वरूपाचे वाटते.

प्रशासकीय कामाच्या निमित्ताने लक्ष्मीकांत देशमुख यांनी मोठ्या प्रमाणात प्रवास केला आहे. याविषयीची प्रचिती त्यांचे 'मधुबाला ते गांधी' हे पुस्तक वाचताना येते. या त्यांच्या ललित लेखसंग्रहामध्ये एकूण पंचेचाळीस लेख आलेले आहे. त्यांच्या ठिकाणी असलेली रंजकता, उत्कटता, काव्यात्मकता आणि विविध विषयांची संदर्भबहुलता देखील त्यांच्या प्रस्तुत लेखसंग्रहाच्या माध्यमातून प्रतिबिंबित होते. सामाजिक वास्तवाची चिकित्सा करताना 'हिरवळ आणिक पाणी' या लेखात देशमुख पुढील विवेचन करतात, ''युद्ध, मूलतत्त्ववाद आणि व्यक्तिस्वातंत्र्यावरचा घाला यामुळं देशांतर करून निर्वासित झालेल्यांच्या समस्या व सुखदु:खाची जातकुळी आणखी वेगळीच आहे. त्याचं सर्वात ठळक उदाहरण म्हणजे तिबेटचे बौद्ध धर्मगुरू दलाई लामा व त्यांचे हजारो नागरिक.''[३] यामाध्यमातून त्यांनी धरणांमुळे विस्थापित होणाऱ्या माणसांच्या व्यथा लिहिताना स्थलांतरितांच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे स्वरूप सहज पण अत्यंत गंभीरपणे विशद केले गेलेले दिसून

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 65 : लक्ष्मीकांत देशमुख यांचे समग्र साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October -2018

येते. या ग्रंथातील लेखन बहुसंख्यवेळा काव्यात्म पातळीला स्पर्श करताना दिसते. अर्थपूर्ण अशाप्रकारच्या सुंदर विधानांचा मुक्त वापर जागोजागी झालेला पहावयास मिळतो.

अशाप्रकारच्या ललित लेखनाबरोबरच लक्ष्मीकांत देशमुख यांची 'दूरदर्शन हाजीर हो' आणि 'अखेरची रात्र' ही दोन नाटके प्रसिद्ध आहेत. यापैकी 'दूरदर्शन हाजीर हो' हे बालनाट्य आहे. वर्तमान समाजव्यवस्थेमध्ये दूरदर्शनच्या आहारी गेलेल्या लहान मुलांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे ज्या विविध समस्या निर्माण होतात त्यावरती उपाय सुचविणारे हे नाटक आहे. दुरदर्शनमुळे लहान मुलांच्या बौद्धिक, शारीरिक पातळीवरच्या समस्या वाढत गेल्या. दुरदर्शन व्यक्तिमत्वाच्या घडणीसाठी की त्यांना बिघडविण्यासाठी, असा प्रश्न निर्माण झाला. या प्रश्नाच्या अनुषंगाने वर्तमान सामाजिक प्रश्नाची चर्चा लेखकाने केलेली दिसून येते. तर 'अखेरची रात्र' हे दोन अंकी नाटक हिंदी चित्रपटसृष्टीतील गुरुदत्त या नयकाच्या शोकांतिकेवर आधारित आहे. गुरूदत्तच्या असफल प्रेमकहाणीतून कलावंताच्या आयुष्यातील वेदना यामाध्यमातून त्यांनी अभिव्यक्त केल्याचे दिसून येते.

लक्ष्मीकांत देशमुख यांची एकूणच लेखणी पाहता त्यांची दृष्टी ही समाजव्यवस्थेच्या निरीक्षकाची आहे हे स्पष्ट होते. वर्तमान समाज सद्या आहे त्यापेक्षा चांगल्या अवस्थेत असावा, सांविधानिक चौकटीत राहून विज्ञान, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या प्रकाशमूल्यांची जपणूक करणारा असावा अशाप्रकारची त्यांची भूमिका असल्याचे प्रत्यंतर त्यांचे साहित्य वाचत असताना निश्चितपणे येते. थोडक्यात लक्ष्मीकांत देशमुख यांचे साहित्य हे वास्तवदर्शी आहे इतकेच नव्हे तर त्यांच्याजवळ वास्तव समाजाचे भान आहे म्हणूनच त्यांचे लेखन हे वर्तमान समाजाविषयीची आत्मियता प्रकट करणारे असून अतिरंजकतेचा लवलेशही नसल्याचे दिसून येते. नुकतेच बडोदा याठिकाणी झालेल्या आखिलभारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या भाषणामधून त्यांचे प्रत्यंतर येते. आपला लेखनाविषयीचा आणि एकूणच साहित्यिकांच्या भूमिकेचा आढावा घेताना लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात पुढील उल्लेख केला आहे, ''त्या अर्थाने लेखक, कलावंत हे समाजासाठी मार्गदर्शक असतात. ते समाजपुरुषापुढे लेखनातून आरसा धरतात व त्याच्या चेहऱ्यावर चढलेली व मनात घर करून असलेली काजळी व विद्रूपता–कुरूपता दाखवतात व सांगतात की, ती कमी करीत आपला मूळचा मानवी चेहरा व सुंदर नैतिकता असलेले विवेकी मन अधिक सुंदर, अधिक उजळ बनव! भारतीय संस्कृतीचे सार तीन शब्दांत सांगायचे झाले तर, ते 'सत्यं–शिवं–सुंदरम' असे सांगता येईल. सत्य कठोर असले तरी, ते शिव म्हणजे अंतिमतः मंगलमय, लोककल्याणी असते म्हणूनच ते सुंदर असते आणि म्हणूनच जीवनातील विषमता व द्वेषरूपी कुरूपता नष्ट करून ते सुंदर व शिव करणे हेच साहित्याचे नैतिक व सामाजिक प्रयोजन असते. ते करण्याचा मी माझ्या कुवतीप्रमाणे आजवर प्रयत्न केला आहे, व पुढेही करीत राहीन.''[8] या माध्यमातून एक साहित्यिक म्हणून लेखकाची समाजाविषयीची असणारी आत्मियता त्यांनी अत्यंत मोकळेपणाने मांडलेली दिसून येते. इतकेच नव्हे तर बदलत्या समाजाला एकप्रकारे दिशा दाखवून देण्याचे महत्वपूर्ण कार्य देखील लक्ष्मीकांत देशमुखांचे हे विचार निश्चितपणेच करतात. वास्तविक पाहता मानवी जगणे हे सुंदर आहे, ते अजूनही सुंदर करण्यासाठी चांगल्या मार्गाचा अवलंब आपणास करावा लागेल ही मानव्याची प्रमाणिक भूमिका लक्ष्मीकांत देशमुखांचे हे विचार मांडतात. अशाप्रकारचे विचार मांडत असताना देशमुख अत्यंतिक आत्ममग्न होतात. त्यामुळेच त्यांच्या विचारामध्ये मानुसकीचा ओलावा अनुभवावयास मिळतो. त्यापाठीमागे महाराष्ट्रातील मराठी तरूण तरला पाहिजे ही प्रांजळ



Scanned with OKEN Scanner